# हडप्पा

## रक्तधारेचा अभिशाप



www.VineetBajpai.com

# प्रस्तावना

## इ.स.पू. 1700

मैलोनमैलापर्यंत केवळ तो एकच मनुष्य दिसत होता. त्या विलक्षण भयंकर, वादळी रात्री त्याला बहुधा काहीच दिसत नसावे. विशेषतः त्याच्या रक्ताचे, अश्रूंचे आणि घामाचे ओघोळ अवकाळी पडत असलेल्या पावसाच्या चिखलाच्या पाण्यात मिसळत होते आणि त्याची दृष्टी मंद करत होते. पूर्णपणे काळोख्या रात्री तो डोक्यावर शेंडी असलेला, उघड्या अंगाचा ब्राम्हण उतावीळ तरीही व्यर्थ वेगाने त्याची कुऱ्हाड पुढे–मागे घेताना अडखळला. नुकत्याच बांधलेल्या मनुष्य–निर्मित विटा आणि कांस्याच्या पर्वताच्या एका खांबाला बांधलेल्या किमान एका तरी जाडसर दोरखंडाला कापण्याचा तो प्रयत्न करत होता.

नदीचा प्रवाह बदलण्याच्या उद्दिष्टाने दगड, विटा, धातू आणि लाकडी ठोकळे वापरुन बनविण्यात आलेला तो प्रचंड ढिगारा एखाद्या खवळलेल्या समुद्राच्या भयंकर त्सुनामीचा हल्लादेखील परतावून लावण्यास सक्षम वाटत होता. पण ज्या नदीसाठी तो बांधण्यात आला होता ती काही एखाद्या प्रचंड समुद्रापेक्षा कमी नव्हती.

मुसळधार पावसाच्या आवाजातच स्वतःशी बडबडत, एखाद्या पछाडलेल्या व्यक्तीप्रमाणे त्याने वर्षानुवर्षांची तपस्या आणि वैदिक शिस्तीद्वारे कठोरपणे

घडविलेल्या आपल्या शरीरातील बळाचा प्रत्येक औंस वापरला. त्याची बोटे वाकडी होऊन त्यातून रक्तस्त्राव होऊ लागला तरीदेखील तो अजूनही बेफामपणे त्या दोरखंडावर आघात करतच होता. जेव्हा त्याची श्वास घेण्याचीही ताकद संपली तेव्हा त्याने आपले डोके मागे सोडले आणि एकदा वरती आकाशाकडे पाहिले, मोठ्या आकाराचे पावसाचे थेंब जणू काही रागाने त्याच्या चेहऱ्यावर आदळत होते.

त्याच्या भुवयांवर लागलेला लालसर चिखल या गढूळ पाण्याद्वारे धुतला जात असताना, त्याने भयावह आणि गगनभेदी किंकाळी फोडली. त्याच्या नुकत्याच अपवित्र झालेल्या आत्म्याने देवांना त्याची अवर्णनीय अशी अस्वस्थता समजावी म्हणून केलेला तो एक प्रयत्न होता. पण त्याला माहिती होते की आता खूप उशीर झालेला आहे. त्याच्या कृत्यांमुळे देवही भयभीत झाले होते आणि त्याला किंवा इतर कोणालाही क्षमा करणार नव्हते.

त्याच्या लहानशा कुऱ्हाडीने त्याने पूर्वीपेक्षा अधिक जोराने पुन्हा दोरखंड कापण्यासाठी त्यावर आघात करण्यास सुरुवात केली. त्याला माहिती होते की मागच्या तासाभरापासून तो केवळ एका सांध्याची गाठ कापण्याचा प्रयत्न करत होता. त्याच्या स्वतःच्या सूचनांनुसारच ते दोरखंड बनविण्यात आले होते. त्याला माहिती होते की अजून विटा, कांस्य आणि दगडाचे बनलेले यासारखेच 998 खांब आणखी होते, ज्यांना अशाच हजारो दोरखंडांच्या गाठींनी एकत्र केलेले होते आणि त्यातूनच न तुटू शकणाऱ्या पर्वताची निर्मिती झाली होती. जर हजारो पुरुषांनी दिवस–रात्र काम केले तर तो पर्वत तोडून वेगळा करण्यासाठी काही आठवड्यांचा कालावधी निश्चितपणे लागला असता. त्यानेच काळजीपूर्वक अभ्यास केलेल्या वास्तूशास्त्रीय आणि ज्योतिषीय मार्गदर्शक तत्वांच्या आधारे हे योजनाबद्ध तंत्रज्ञानाने आणि मजबुतीने हे 999 खांब बांधले गेले होते. तो काय करत होता? त्याला वेड लागले होते का? त्याला माहिती होते की या प्रचंड पर्वताला तो तसूभरही हलवू शकणार नव्हता. याची पुन्हा एकदा जाणीव झाल्यावर त्याने आपला सुरु असलेला प्रयत्न थांबवून निराशेने ती कुऱ्हाड दूर फेकून दिली.

मैलोनमैल रिकाम्या व एकाकी असलेल्या भूभागावर मध्यरात्रीच्या ढगफुटीमुळे

उध्वस्त झालेली ती निर्जन आकृती विवास्वन पुजारीची होती, असा पुरुष ज्याची एक देवता (अर्ध—पुरुष, अर्ध—देवता) म्हणून कित्येक दशके पूजा केली गेली होती, ज्याला हडप्पाचा सूर्य म्हणले जाई, तो आता एखाद्या भुताप्रमाणे दिसत होता. टाळता न येणाऱ्या आणि पुढे घडत असलेल्या भयानक परिणामांमुळे त्याला प्रचंड वेदना होत होत्या आणि अतिशय दुःख वाटत होते. तो तसाच घाव घालत, बडबडत, रडत राहिला. आणि मग त्याने ते ऐकले.

त्या गोष्टीला सुरुवात झाली होती.

त्या प्रचंड नदीत अशुभ गडगडाट होऊन तिचे एका अनैसर्गिक जोरदार प्रवाहात रुपांतर होत होते, ते कुठेतरी दूर घडत होते... पण फार लांब नव्हते, हा आवाज ऐकल्यावर त्याचे रक्त गोठून गेले. कधीकाळी उदार, प्रेमळ व संगोपन करणारी मातेसमान ही नदी एका रक्तधारेत परावर्तित झाली होती आणि तिच्या स्वतःच्या मुलांना ती गिळंकृत करण्यास पुढे सरसावत होती. तिच्या आवडत्या पुत्रांपैकी एकाने त्या ज्ञानगंगेचा विश्वासघात केला होता. तिच्या देवतेस्वरूप पुत्राने, विवास्वन पुजारीने तिचा विश्वासघात केला होता.

कधीकाळी सदाचारी आणि दुर्दम्य असणाऱ्या विवास्वन पुजारीच्या हातातली कुऱ्हाड खाली गळून तिथल्या घाण चिखलात धब्ब असा आवाज करत पडली. त्याची क्रोधित माता तिच्या आसुरी स्वरुपात जेथून प्रगट होईल त्या दिशेने पाहत तो निश्चल उभा राहिला. एक गोष्ट मात्र त्याला आधीच माहिती होती. तिच्या वेदीवर त्याचेच रक्त सर्वात आधी सांडणार होते. अचानकपणे, त्याला असेच घडायला हवे असे वाटत होते.

हळूहळू त्याच्या शरीरातील वेदना कमी होत त्याला शांतता जाणवत होती. त्याला आशा वाटू लागली होती. बहुधा त्याची माता इतर लाखो जीवांचे आयुष्य वाचवून केवळ त्याचाच नाश करणार होती. तो आपल्या गुडघ्यांवर बसला आणि शरण जाण्याच्या स्थितीत त्याने आपले हात आपल्या बाजूला दूर पसरले आणि हातांचे तळवे उघडले. पावसाने त्याला व त्याच्या जखमी शरीराला स्वच्छ धुवून काढले होते जणूकाही तो वर्षाव त्याच्या वाईटरित्या अडकून बसलेल्या विवेकबुद्धीला स्वच्छ करण्यास त्याला मदत करत होता. जणूकाही दयनीय विवास्वन पुजारी

स्वतःचे शेवटचे स्नान करून घेत होता.

'हे सर्वशक्तिमान माते, माझे आयुष्य घे! माझ्यामुळे तुला क्रोधित व्हावे लागले. मी स्वतःला तुझ्या हवाली करतो!' तो ओरडत म्हणाला, तेव्हाच कोपिष्ट मेघगर्जनेने व विजेच्या कडकडाटाने रात्रीचे आकाश क्षणभर प्रकाशित झाले. जणू देव त्या कोसळलेल्या देवतेची विनवणी नाकारत होते.

तो पुन्हा ओरडला, यावेळी त्याचा आवाज हताशपणा आणि रडवेला झाल्याने दुभंगला होता, 'हे सर्वशक्तिमान माते, तू तुझ्या या म्लान होऊन पडलेल्या पुत्राचे ऐकणार नाहीस का?! माझे आयुष्य घे, पण इतरांना माफ कर! तुझ्या पुत्राने जे पाप केले आहे ते त्यांनी केलेले नाही. मला घेऊन जा!!!'

आकाश पुन्हा चमकले. क्षणभर दिवसासारखा प्रकाश पडला होता. विवास्वन पुजारीच्या रक्तस्त्राव, घामेजलेले शरीर आणि भ्रमिष्ट चेहऱ्यावर क्षणभर शांत विद्युल्लता चमकून गेली. आणि मग ते घडले. मेघगर्जनेनंतरचा झालेला गडगडाट एखाद्या सूर्याच्या विस्फोटाइतका मोठा होता.

देव पुन्हा नकार देत होते!

विवास्वन पुजारीला त्याच्या चेहऱ्यावर वाऱ्याचा एक जबरदस्त आलेला झोत जाणविला, त्याला नजरेच्या कोपऱ्यातून दूर टप्प्यावर पाण्याचा प्रचंड मोठा पर्वत तो जिथे गुडघ्यांवर कोसळून पडलेला होता त्याच मार्गाने येताना दिसला. जणू एखादा प्रचंड मोठा हायड्रा ड्रॅगन आपल्या भक्ष्याकडे आपले लक्ष केंद्रित करत होता. नदीच्या प्रवाहाच्या घोंघावण्याचा ऐकू येणारा आवाज मघाशी झालेल्या मेघगर्जनेपेक्षाही कित्येक पटींनी मोठा होता. विवास्वन पुजारीने वरती बघितल्यावर त्याला प्रचंड मोठ्या पर्वताएवढ्या पाण्याच्या प्रवाह समोर दिसला. तो आश्चर्यचकित होऊन बघतच राहिला, त्या प्रवाहाची काळोखातदेखील अस्पष्ट सावली दिसत होती. सुमेरू पर्वतासमोर चालणाऱ्या एखाद्या मुंगीइतका तो लहान दिसत होता, त्याच्या मातेसमान नदीतून निर्माण झालेली आभाळाएवढी उंच त्सुनामी त्याला गिळंकृत करण्यापासून केवळ काहीच क्षण दूर होती.

शेवटच्या काही दिवसांत विवास्वन पुजारी आपले सामर्थ्य गमावू लागला होता. त्याने घेतलेल्या आंधळ्या सूडाच्या शेवटच्या काही दिवसांत त्याने आयुष्यभराचा गौरव गमावला होता. पण तो विवास्वन पुजारी होता. तो एक देवता होता! प्रगत यौगिक क्रिया शिकलेल्या व्यक्तींप्रमाणे त्याने स्वतःच्या कुंडलिनीभोवती आपला आत्मा आणून केंद्रित केला, स्वतःच्या हृदयाचे ठोके थांबविले आणि त्याच्या मर्त्य शरीरास मृत्यूसाठी तयार केले. त्या आक्रमक पाण्याच्या शक्तीद्वारे त्याला जमिनीवरून उचलून फेकले जात असतानादेखील त्याने शांतपणे एक शेवटची प्रार्थना पुटपुटली.

"माते, त्यांना क्षमा कर. माझ्या पापांची शिक्षा त्यांना देऊन त्यांचा नाश करू नकोस. माते, क्षमा कर त्यांना!"

एखादी प्रचंड तुफानी वावटळ जसे एखाद्या वाळक्या काडीचे अस्तित्व क्षणार्धात नाहीसे करून टाकते त्याप्रमाणे विनाशकारी नदीने देवता विवास्वन पुजारीला गिळंकृत केले. देव, खुनशी रक्त–धारा, काळोखी रात्र, इंद्राची मेघगर्जना, विस्तीर्ण भूप्रदेश आणि निर्दयी पाऊस एका महान व्यक्तीच्या अंताची साक्ष म्हणून तेव्हा उपस्थित राहिले. पण विवास्वन पुजारीच्या मृत्यूमुळे त्याचा पृथ्वीवरील प्रभाव संपणार नव्हता. ती एक सुरुवात होती. पुढील हजारो वर्षांकरता तो द्वेष, कपट, कारस्थान आणि हिंसक संघर्षाद्वारे तो जिवंतच राहणार होता. तो केवळ आर्यावर्तालाच नव्हे तर संपूर्ण जगालाच, त्याला सोडून गेलेल्या देवांच्या नावाने होणाऱ्या व कधीही न संपणाऱ्या रक्तपात आणि हत्येच्या चक्रात झपाटून टाकणार होता. त्याचा मृत्यूसुद्धा त्याला किंवा मानवजातीला त्या शापातून मुक्त होऊ देणार नव्हता.

तिने तिचा निर्दयी प्रवाह तसाच पुढे जात राहू दिला. विवास्वन पुजारीच्या अंतिम विनवणीनंतरदेखील रक्तधारा त्यांना क्षमा करणार नव्हती.

हडप्पात राहणाऱ्या प्रत्येक मनुष्य, प्राणीमात्र व इतर जीवांसह या प्रचंड हडप्पा महानगराला सरस्वती नदी गिळंकृत करून टाकणार होती.



## दिल्ली, 2017

# विद्‌युत

मोबाईलची रिंग थांबण्याची चिन्ह काही दिसेनात. विद्युत आणि दामिनी दोघेही गाढ झोपेत होते आणि एकामध्येही उठून फोन घेण्याइतपत त्राणही नव्हते. पहाटेचे 4:30 वाजलेले होते. फोनची रिंग अजूनही सतत सुरूच होती. दामिनीने हळूहळू उठत विद्युतला जागे करण्याचा प्रयत्न केला.

'विद्युत... उठ नं तुझा फोन वाजतोय.'

'हो ...' असे तो पुटपुटला.

'अरे उठ ना राजा,' दामिनी डोळे न उघडताच पुन्हा म्हणाली विद्युतने पलंगाच्या शेजारील टेबलावर चाचपडत फोन शोधण्याचा प्रयत्न केला.

'अशा रात्री–अपरात्री कोणी फोन केला आहे? ! हॅलो...!' असं फोन उचलत असताना जवळजवळ तो ओरडलाच. खोलीत शांतता होती विद्युत पलंगावर बसला आणि पलीकडून जे सांगितले जात आहे त्यातला शब्द न शब्द

लक्षपूर्वक ऐकत होता. त्याच्या भुवया जितक्या ताणल्या गेल्या होत्या, तितकंच त्याच पीळदर शरीर ताठ झालं होतं.

'सगळं ठीक आहे ना?' दामिनीने विचारले.

विद्युतने हलकेच तिचे मनगट दाबले, त्याला पूर्णपणे शांतता हवी आहे हे तो दर्शवित होता. दामिनी विद्युतला चांगलीच ओळखत होती. तिने तिचे डोळे उघडले आणि पाहिले की विद्युतने फोन त्याच्या कानाजवळ घट्ट धरला होता, दात घट्ट मिटून धरले होते आणि डोळे पूर्ण बंद करून तो एकाग्रतेने ऐकत होता.

'पण पुरोहितजी, मला तुम्ही हे लवकर का सांगितलं नाही? विद्युत फोनवर समोरच्या व्यक्तीला म्हणाला... पुरोहितजी कोण आणि विद्युत अचानक इतका चिंतित का दिसतोय याची दामिनीला पुसटशीदेखील कल्पना नव्हती. ती हाताच्या कोपरावर फिरून उठून बसली आणि काळजीपूर्वक ऐकू लागली.'

'त्यांच्याकडे किती वेळ आहे, पुरोहित जी?' विद्युतने खिन्नपणे विचारले काही क्षणांचा अवधी गेला आणि त्याने प्रत्युत्तर दिले.

'आज सायंकाळपर्यंत मी तिथे पोहोचेन' विद्युतने फोन ठेवला आणि त्याचे डोके पलंगावरच्या उशीवर विसावले आणि छताकडे एकटक पाहत तो पडून राहिला. भरदार छाती पिळदार दंड आणि खांदे जे त्याच्या गोऱ्या रंगाने उजळलेले होते त्यामुळे त्याचे रूप अभिजात वंशातल्या राजबिंड्या व्यक्तिमत्त्वासारखे वाटत होते. त्याच्या या वैशिष्ट्यपूर्ण रुपात त्याच्या लांब, पिंगट तपकिरी केसांनी आणि भेदक डोळ्यांनी आणखीनच भर घातली होती. त्याच्या नावाच्या प्रत्येक अक्षरासारखेच त्याचे रूप होते– विद्युत किंवा शक्तिप्रवाह! पण त्याच्या ग्रीक देवतेसारख्या रुपामध्ये केवळ एवढेच नव्हते, त्याच्या व्यक्तिमत्त्वात असंख्य महत्वाच्या गोष्टी होत्या.

दामिनीला माहित होते की तिने एका विचित्र पण सामर्थ्यवान पुरुषावर प्रेम

केलेय आणि वरकरणी ती त्याच्याशी यावर काही बोलली नसली तरी मनात खोलवर तिने एकेदिवशी त्याच्याशी लग्न करण्याची खुणगाठ बांधली होती.

तिला माहित होतं की आतापर्यंत तिला भेटलेली दिल्ली विद्यापीठाच्या उत्तरेकडील आवारातल्या प्रिमियर हंसराज कॉलेजमधील मुले आणि पुरुष तसंच तिला इतरही भेटलेल्या व्यक्तींपेक्षा विद्युत पूर्णपणे वेगळा होता. हवाहवासा वाटणारा पण गुंतागुंतीचा, रुबाबदार, बायबलमधल्या जेत्यासारखा गडद तपकिरी डोळ्यांचा आणि जगावर अधिराज्य गाजविण्यास आलेल्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील प्रखर भाव असणाऱ्या या व्यक्तीवर हक्क गाजविण्याच्या तिच्या सुप्त इच्छेखेरीज तिला खाली पटली होती की विद्युत तिला असामान्यपणे एक इश्वरी देणगी म्हणूनच लाभलेला होता. आणि तो होताही तसाच प्रतिभा, कुशलता, धार्मिकता आणि महत्त्वकांक्षेने विद्युत ओतप्रेत भरलेला होता. वयाच्या केवळ 34 व्या वर्षीच तो व्यवसायातील उत्कृष्टतेच्याही पलीकडे पोहोचला होता. तो एक संगीतकार, कवी, चित्रकार, युद्धकलेत निपुण, सर्वांमध्ये मिसळणारा आणि स्वाभाविकपणे नेतृत्व करणारा होता. त्याचे मित्र त्याला प्रेमाने व्हिडिओ म्हणत असत. त्याला असलेल्या नाना तऱ्हेच्या मित्रांमुळेच कधीकधी दामिनीला काळजी वाटायची.

'राजा तू ठीक आहेस ना?' तिने साधारण मिनिटभराने हळुवारपणे विचारले.' हे पुरोहितजी कोण आहेत, आणि आज संध्याकाळपर्यंत तू कुठे असला पाहिजे?

'वाराणसी..... किंवा काशी वा बनारस ...जसं बरेचसे लोक म्हणतात' छताकडेच नजर ठेवून तो उत्तरला.

'बनारसला का बरं? तेही अचानक?'

'खरंतर अचानक नाही दामिनी... पण अशा पद्धतीने बोलावलं जाणं मला अपेक्षित नव्हतं. मी पुन्हा कधीही काशीला जायचं नाही असं ठरलं होतं'

खोलीत संपूर्ण शांतता होती. विद्युतच्या तोंडून बाहेर पडत असलेली रहस्यमय आणि असंबद्ध विधाने ती अविश्वासाने ऐकत होती. तो नेहमीसारखा वागत नव्हता.

आणि तिच्यातली आत्मविश्वासू पत्रकारदेखील तिला चटकन हव्या असलेल्या उत्तरांसाठी प्रदीर्घ काळ थांबू देण्यास तयार नव्हती. ती पूर्णपणे जागृत अवस्थेत उठून बसली एखाद्या सुंदर आणि आत्मविश्वासू स्त्रीप्रमाणे तिने केसांचा चाप दातांमध्ये धरून पटापट केसांचा अंबाडा बांधला आणि अदबीने पण दक्षतापूर्वक तिच्या प्रश्नांचा रोख विद्युतवर वळवला.

'काशी? म्हणजे बनारस... किंवा वाराणसी किंवा जे काही असेल ते! तू तिथे का जायला हवं, राजा? तुला काय अपेक्षित नव्हतं? आणि तू त्या जागी पुन्हा कधीही का जायचं नव्हतं? पहिल्यांदा तू तिथे केव्हा गेला होतास? आणि आतापर्यंत आपण याबद्दल कधीच कसं काय बोललो नाही? तू मला सगळं काही नीटपणे सांगशील का? दामिनी जितकी चिंतेत होती तितकेच या गोष्टीचे तिला कुतुहूल वाटत होते.

तिच्याकडे पाहण्यासाठी विद्युत वळला जणूकाही फोन वाजल्यापासून प्रथमच त्याला तिचे अस्तित्व जाणवले होते.

'आपण याबद्दल बोललो नव्हतो कारण ते तितकेसे महत्वाचे नव्हते. काशी हे प्रकरण माझ्यासाठी बंद झाल्यासारखेच होते. कित्येक वर्षांसाठी जेव्हा मी तिथे माझ्या भूतकाळाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मला असे करण्यापासून रोखण्यात आले. आणि आता जेव्हा मी भूतकाळाच्या खुणा विसरून जगायला शिकलो आहे, तेव्हा त्यांनी मला बोलावणे धाडले आहे?' अविश्वासाने हसत तो म्हणाला.

दामिनीच्या मनामध्ये विचारांची जुळवाजुळव होण्यापूर्वीच विद्युत पलंगावरून ताडकन उठला आणि कपाटाकडे चालत गेला. त्याने सिगारेटचा बॉक्स बाहेर काढून एक सिगारेट शिलगावली आता दामिनी खरोखरंच अस्वस्थ झाली होती. विद्युतने नऊ महिन्यांच्या कालावधीनंतर पुन्हा एकदा सिगारेट ओठांत धरली होती आणि आता तिला कळलं होतं की, काहीतरी खरोखरंच बिनसतंय गुरगावमधल्या उच्चभ्रू वस्तीत ज्या विचित्र पेंटहाऊसमध्ये ती त्याच्यासोबत राहत होती त्यातील बाल्कनीत तो चालत गेला, तेव्हा तिचे डोळे शांतपणे त्याच्या प्रत्येक हालचालीकडे पाहात होते. त्याच्या मागोमाग ती देखील

बाल्कनीत आली आणि त्याच्या शेजारी बाल्कनीच्या रेलिंगकडे झुकत उभी राहिली तिने एक फिकट आणि लहानसा सैल झगा घातला होता ज्यामुळे तिच्या सडपातळ आणि मादक शरीराच्या देखणेपणात अधिकच भर पडली होती. दामिनी जितकी बुद्धिमान होती तितकीच ती रूपवान देखील होती. ती एकही शब्द न बोलता शांत उभी होती विद्युत त्याच्याच गाढ तंद्रीत उभा होता.

जेव्हापासून तिला तो घाबरल्यासारखा वाटत होता, तेव्हा तो नक्की कोणत्या गोष्टीला घाबरला आहे हे तिलादेखील माहीत नव्हते.

काशी हे हिंदू धर्मातील सर्वाधिक पवित्र शहर आहे कदाचित सर्वाधिक प्राचीन धर्म आणि पृथ्वीवरील जीवनशैली असणाऱ्या मूलतः काशी आणि वाराणसी या नावांनी ओळखले जाणारे हे शहर शेकडो–हजारो वर्षे गेल्यानंतर पहिल्यांदा बारानसी म्हणून ओळखले जाऊ लागले आणि मग पाली साहित्य संस्कृतीच्या प्रभावाखाली आल्यावर ते बनारस म्हणून ओळखले जाऊ लागले. हिंदू पुराणांत लिहून ठेवल्यानंतर जेव्हा महापूर येऊन, जग उद्ध्वस्त होण्याची वेळ म्हणजेच 'प्रलय' येईल तेव्हा भगवान शिव स्वतः काशीला त्रिशूळाच्या टोकावर उचलून काशीचे रक्षण करतील. एक असे शहर ज्याने हजारो वेळा ऋतूचक्र पूर्ण केले, असे हे वाराणसी म्हणजे काही सर्वांत महान गूढ अभ्यासकांचे आणि या जगातील शक्तीचे तसेच इतर सर्वांचेही वसतीस्थान आहे असे मानले जाते या ग्रहाच्या सर्वाधिक भयानक रहस्यांना आपल्या पोटात सामावून घेणारे हेच ते शहर आहे.

नवी दिल्ली ते वाराणसीची ती 90 मिनिटांची फ्लाईट होती. विद्युत दुपारची तीन वाजताची फ्लाईट घेणार होता, जेणेकरून तो 6 वाजेपर्यंत पुरोहितजींकडे पोहोचला असता. त्याचे काही एकनिष्ठ असे सहकारी व मित्र होते जे त्याच्यासाठी सर्व गोष्टींची काळजी घेत असत आणि तोही त्यांची काळजी घ्यायचा. विद्युत आणि त्याचा मुख्य चमू जणू

एकजीवपणाने काम करत असत, त्यामुळे त्यांच्यात अगदी थोड्या संवादाची गरज असे. एका दृष्टीक्षेपात किंवा फोनवरील दोन–तीन शब्दांच्या संदेशाद्वारेच बऱ्याचशा गोष्टींची सोय होत असे. विद्युतचा प्रिय मित्र बाला म्हणजेच बालकृष्णन त्याच्या सर्वाधिक विश्वासू व जवळचा मित्र होता, केवळ तोच एक असा व्यक्ती होता ज्याच्यावर विद्युतचा संपूर्ण विश्वास होता. बाला केवळ कंपनीमध्ये विद्युतनंतरच्या पदावरच नव्हता तर तो त्याचा परममित्र देखील होय तो एक माजी सैनिक होता, ज्याने त्याच्या थोड्याशाच सेवा कालावधीत बरीच लष्करी पदके प्राप्त केली होती. बाला ज्या रीतीने निशस्त्र लढाईत प्रतिस्पध्याची हाडे खिळखिळी करू शकत होता तितक्याच सहजतेने तो जटील आर्थिक मॉडेल्सचा गुंता सोडवू शकत होता आणि त्याने विद्युतला सर्वस्व बहाल केले होते, त्याने विद्युतवर प्रेम केले होते.

विद्युत एक कॉर्पोरेट सिक्युरिटी कंपनी चालवीत होता, जी त्यांच्या मोठमोठ्या बहुराष्ट्रीय क्लायंट्सना तंत्रज्ञान–आधारित स्पर्धात्मक हेरगिरीपासून सुरक्षा पुरवीत होती. विद्युतने एक लहान स्टार्टअप कंपनी म्हणून सुरुवात केली होती, जी आता भारतातील आघाडीच्या औद्योगिक सुरक्षा कंपन्यांपैकी एक होती. त्याच्या कंपनीच्या यशाने विद्युत एक महत्वाचा व्यक्ती झाला होता आणि भारतातील कॉर्पोरेट जगतावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींशी आता त्याचा संबध येऊ लागला होता. सत्तेतील राजकारणी ज्यांना कंपन्यापेक्षाही तंत्रज्ञान आधारित सुरक्षेची गरज जास्त भासते त्यांना विद्युतच्या कंपनीद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा आणि उत्पादनांचा उपयोग चटकन लक्षात आला होता. त्यांच्या सामाजिक भोजने आणि बगिंच्यातल्या रात्रीच्या जेवणावेळी विद्युत उपस्थित असणे ही त्यांच्यासाठी अभिमानाची बाब होती अगदी तरुण वयातच विद्युत एक वजनदार व्यक्ती झाला होता. पण ज्या लोकांना त्याचा वंश माहिती होता म्हणजे पुरोहितजी सारख्या व्यक्तींना, त्यांना यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते. विद्युत कोणी सामान्य व्यक्ती नव्हता. तो सामान्य असणे अपेक्षितच नव्हते.

विद्युतने नेहमीच्या वापरातला करडा टी–शर्ट आणि निळी जीन्स घातली होती त्यामुळे तो जास्तच तरुण वाटत होता. तो एक दोन दिवसासाठीचे त्याचे सामान भारत होता. दामिनीला जे काही घडत होतं त्याची अतिशय काळजी वाटत होती पण तरीदेखील धीर गोळा करून तिने चेहऱ्यावरील हसू कायम ठेवले होते. विद्युतने एकटक तिच्याकडे पाहिले आणि नेहमीप्रमाणे छान हसत त्याने गमतीने तिच्याकडे पाहत डोळे मिचकावले. त्याला तिची काळजी कमी करायची होती आणि सर्व काही नेहमीसारखे आहे असे दाखविण्याचा प्रयत्न तो करत होता. पण सर्व काही आलबेल नाही हे दोघांनाही माहित होतं.

त्याचं जे काही पॅकिंगच काम होतं ते उरकल्यावर विद्युत क्षणभर थांबला आणि खिडकीपाशी जाऊन थांबला. बालाने फ्रिजमधून नारळ पाण्याचा कॅन बाहेर काढला व तो शांतपणे जेवणाच्या टेबलापाशीच्या खुर्चीवर ते गोड नारळ पाणी निवांत पीत बसला. बालाचे घरामध्ये वावरणे दामिनी आणि विद्युतसाठी सवयीचे होते आणि त्यांना ते आवडायचे. तो त्यांच्या कुटुंबाचा एक भागच होता. विद्युतने बालाकडे पाहिले.

‘अरे बाला!’

‘बोल व्हिडीओ’

‘कसा आहेस मित्रा? जेवलास का?’ विद्युतने विचारले.

‘हो, होय... बाला आपल्या मित्राकडे न पाहताच उत्तरला. आजच्या दिवसासाठी एवढी आपुलकीही पुरेशी होती. पण विद्युसाठी जणू ते संपूर्ण जगच होते.’

पुढं जे घडलं त्यामुळे दामिनी अतिशय घाबरली आणि तिला कल्पनाच करवत नव्हती की असे पुन्हा घडेल. विद्युत त्याच्या अभ्यास खोलीतील तिजोरीकडे गेला आणि त्याने त्यातून महापंचांग बाहेर काढले. दामिनी भीतीने थिजून गेली आणि तिचे तोंड कोरडे पडले होते. विद्युतने मागच्या वेळी जेव्हा हे प्रगत पंचांग बाहेर काढले होते, तेव्हा तो दिवस त्याच्या आयुष्यातील सर्वात वाईट दिवस ठरला होता. त्या दिवशी त्याची प्रिय आई हे जग सोडून गेली होती अत्याधुनिक पोशाख, पेहराव, आकर्षक गाड्या, एक स्वतःच्या मालकीची

तंत्रज्ञान कंपनी असली तरी विद्युत हा वैदिक ज्योतिष शास्त्राचा एक तज्ज्ञ अभ्यासक होता. तो जितक्या विलक्षण कुशलतेने सॉफ्टवेअर कोड्स स्कॅन करायचा तितक्याच कुशलतेने तो लोकांच्या कुंडली वाचू शकत होता.

•||卐||•

दामिनीने तिचे आ वासलेले तोंड आपल्या दोन्ही हातांनी झाकून घेऊन चेहऱ्यावर उमटलेली भीतीची रेषा लपविण्याचा प्रयत्न केला. त्याने तिच्याकडे पाहिले नाही. तो पुन्हा विचारांत गढून गेला होता. बाला जिथे बसला होता तिथे शेजारच्या डायनिंग टेबलावर त्याने पंचांग पसरून ठेवले आणि तोंडातल्या तोंडात त्याने एक संस्कृत श्लोक पुटपुटला व त्या मोठ्या तक्त्यावर तो वाकून पाहू लागला. बाजारात उपलब्ध असलेल्या नेहमीच्या पंचांगापेक्षा हे पंचांग अधिक सविस्तर होते. हिमालयातील एका हिंदू मठामधला त्याचा मित्र गोपाल त्याला दरवर्षी हे अस्सल पंचांग पाठवायचा. तो वास्तविक एक करारच होता. वैदिक ज्योतिषशास्त्रातील ग्रँडमास्टर्सद्वारेच केवळ त्याचे विश्लेषण, अभ्यास आणि वापर केला जाऊ शकत असे. विद्युत त्यांच्यापैकी एक होता आणि दामिनीला विद्युतच्या गूढ वाटणाऱ्या मित्रांपैकी गोपाल एक होता. बालाला दामिनीच्या चेहऱ्यावरील तीव्र भीती तिच्या डोक्यांतून ओघळणारे अश्रू दिसत होते. त्याने विद्युतच्या खांद्यावर हात ठेवला आणि हळुवारपणे विचारले 'काय करत आहेस तू मित्रा?' आत्ता तुला याची काय गरज आहे?

विद्युतने काहीच प्रतिसाद दिला नाही. आता यापुढे दामिनीला काही सहन होणार नव्हते. ती विद्युतच्या बाजूला गेली आणि तिने त्याचा हात घट्टपणे धरत तिच्याकडे त्याचा चेहरा वळविला.

'तू काय करतो आहेस, राजा?' तिने ओरडून त्याला विचारले, तिच्या आवाजातला हुंदका आता फुटणारच होता.

अशाप्रकारे त्याचे लक्ष विचलित केले गेल्यामुळे विद्युत क्षणभर चिडला त्याने त्याचे मन स्थिर केले. त्याला लक्षात आले होते की त्याने या गोष्टींचे स्पष्टीकरण आता द्यायलाच हवे, जेव्हापासून त्याचे पुरोहितजींशी फोनवर

बोलणे झाले होते तेव्हापासून तो एकदम विचित्रपणे वागत होता आणि दामिनीवरचे त्याचे प्रेम त्याला बजावत होते की त्याने तिला सर्वकाही सांगितले पाहिजे किंवा निदान शक्य तितके सर्व सांगायला हवे.

'इकडे ये' असे म्हणत विद्युतने दामिनीला हात धरून प्रेमाने ओढले आणि डायनिंग टेबलच्या शेजारच्या कोचवर तिला बसविले.' मी तुला जेवढं काही महत्वाचं आहे तेवढं दोन मिनिटांत सांगेन किंवा सर्व गोष्टींची तुला वरवर कल्पना देईन, पण त्यासाठी सुद्धा दोन दिवसांचा वेळदेखील अपुरा पडेल, तो सांगत राहिला. दामिनी प्रेमाने विद्युतकडे पाहात होती, तिचे डोळे पाणावले होते आणि अश्रूंचा बांध फुटू न देण्यासाठी अतिशय प्रयत्न केल्याने तिचा सुंदर चेहरा थोडासा पिळवटला होता.

दामिनी जरी मी तुला सगळं सांगितलं तरी तुझा त्यावर विश्वास बसणार नाही. तू कदाचित असा विचार करशील की नेहमीचा विद्युत कुठे हरवला आहे. आतापर्यंत कदाचित वाटले असेल किंवा नसेल पण आता मात्र मी मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा असे तुला वाटेल! विद्युत सौम्यपणे हसत म्हणाला. त्याने तणावपूर्ण झालेली परिस्थिती थोडा हलकी करण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. दामिनी तितक्याच अविश्वासाने आणि भीतीने त्त्याच्याकडे पाहात राहिली.

'राजा, नक्की काय चालू आहे तेवढं मला सांग. तुझी बायको एक कणखर स्त्री आहे. ती नक्कीच हे हाताळू शकते.' असे शक्य तितक्या व्यवहार्य पद्धतीने दामिनी म्हणाली. 'मी आतापर्यंत तू मला सांगावेस असा आग्रह धरत नव्हते पण मी तुला चांगलंच ओळखते. काहीतरी गंभीर घडले नसते तर तू पंचांग बाहेर काढलेच नसते.'

विद्युत क्षणभर शांत राहिला. मग त्याने दामिनीच्या हातांची नाजूक आणि रेखीव बोटे आपल्या हातांत घेतली आणि ती ज्या सोफ्यावर बसली होती तिथे समोर गुडघ्यावर खाली बसला. त्याने मोहकपणे वरती तिच्याकडे पाहिले, यावेळी त्याच्या चेहऱ्यावर खरे हसू होते. त्याने तिच्या हातांचे चुंबन घेतले आणि म्हणाला, 'दामिनी, मी एक अर्ध–मनुष्य, अर्ध–देवता आहे.'